RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापनशास्त्रासंबंधित नवोपक्रमाच्या सद्‌यस्थितीचा अभ्यास

**क्षीरसागर आरती प्रमोद**
एम.एड.प्रशिक्षणार्थी
शिवाजी विदयापीठ कोल्हापूर

**दिवटे मंदाकिनी दादासो**
एम.एड.प्रशिक्षणार्थी
शिवाजी विदयापीठ कोल्हापूर

**खंडागळे विदयानंद संभाजी**
सहायक प्राध्यापक
शिवाजी विदयापीठ कोल्हापूर

## सारांश

*शिक्षणशास्त्र हे एक महत्त्वाचे शास्त्र मानले जाते. शिक्षक प्रशिक्षकांना जर नवोपक्रमांचे कौशल्य असेल तरच ते पुढच्या पिढीकडे संक्रमित करतील. आजच्या स्पर्धेच्या युगात अद्ययावत ज्ञान मिळवण्यासाठी व शिक्षणक्षेत्रात सृजनशीलतेला वाव देण्यासाठी शिक्षण प्रक्रिया नाविण्यपूर्ण करण्यासाठी नवोपक्रमांचा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापनात अवलंब करावा.*

*सदर संशोधनात संशोधकांनी सांगली जिल्ह्यातील 9 शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा अभ्यास केला आहे. या संशोधनाअंती असे आढळून आले की, इतर नवोपक्रमांच्या तुलनेत 'फेस टू फेस' पद्धतीचा वापर अधिक केला जातो.*

**महत्वाचे शब्द :** नवोपक्रम, ,अध्यापनशास्त्र, सद्‌यस्थिती.

### प्रस्तावना

अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतून शिकणे म्हणजे शिक्षण, हा शिक्षणाचा मर्यादित अर्थ आहे. शास्त्रीयदृष्टीने विचार करता शिक्षण म्हणजे वर्तन परिवर्तन होय. हे वर्तन परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षणशास्त्र मदत करते. शिक्षणशास्त्रामधील विविध विषयांच्या अध्यापनातून–अध्ययनातून वर्तन परिवर्तन घडत असते. या शिक्षणशास्त्रामध्ये, विषयांमध्ये सतत जागतिकीकरणामुळे तसेच विद्यार्थ्यांच्या गरजा, शिक्षणातील असलेली स्पर्धा यामुळे नवनवीन तंत्रज्ञानाचा व नवोपक्रमांचा वापर केला जातो. यासाठी या शिक्षणामध्ये सतत नवनवीन उपक्रमांचा अवलंब करावा लागतो।.

### संशोधनाची गरज

शिक्षणामध्ये जागतिकीकरण हा नविन विचारप्रवाह आला आहे.शिक्षणाची गुणवत्ता व शिक्षण देण्याच्या स्पर्धेचे वातावरण तयार झाले आहे.त्याचा फायदा शिक्षणाने घेतला आहे समाजाप्रमाणे शिक्षण परिवर्तनशील असल्यामुळे काळानुरुप, गरजेप्रमाणे एखादया विचारप्रवाहात बदल होतो व तो नव्या समाजात व शिक्षण क्षेत्रात पुन्हा प्रवेश करतो. ही बदलाची मालिका शिक्षण क्षेत्रात सतत चालू रहाते,म्हणून या स्पर्धेच्या युगात टिकुन रहाण्यासाठी विदयार्थ्यांमध्ये परिश्रम करण्याची वृत्ती निर्माण करणे,अडचणींवर मात करण्याची तयारी करणे,व जीवन सुकर करण्यासाठी क्षमताधिष्ठित शिक्षण घेणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी नवोपक्रमाची गरज आहे.

### समस्याविधान

''शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापनशास्त्र संबंधित नवोपक्रमाच्या सद्यस्थितीचा अभ्यास.''

### कार्यकारी व्याख्या

### अध्यापनशास्त्र

सदर संशोधनात अध्यापनशास्त्र याचा अर्थ शिक्षक प्रशिक्षकांना शिकविण्यात येणारे विषय व त्यातील विविध पध्दती असा अर्थ घेण्यात आला आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**नवोपक्रम**

सदर संशोधनात नवोपक्रम याचा अर्थ नवीन काहीतरी आणणारा आणि वर्तमान स्वरुपापेक्षा गुणात्मक दृष्टया वेगळा असणारा विचार वर्तन व बाब होय.

**उद्दिष्टे**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापनशास्त्र संबंधित नवोपक्रमांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

**गृहितके**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापन शास्त्रात नवोपक्रमांचा वापर करतात.

**संदर्भ साहित्याचा आढावा**

रमणाराव बी. व्ही. (२०१३). यांच्या 'ॲन ॲनालिटिकल स्टडी ऑफ इनोव्हेटिव्ह बिहेव्हिअर ॲन्ड ऑक्युपेशनल स्ट्रेस इन प्रायमरी ग्रेड टीचरस ऑफ बिलासपूर डिव्हीजन' या संशोधनात असे दिसून आले की, प्राथमिक स्तरावरील स्त्री शिक्षिका अधिक नवोपक्रम राबवताना दिसून येतात, त्यामुळे त्यांचे अध्यापन पुरूष शिक्षकांपेक्षा अधिक परिणामकारक होते.

एन. कल्पनाकुमारी (२०१२) यांच्या 'मॉडेल ॲन्ड इनॉव्हेटिव्ह प्रॅक्टीसेस ॲन्ड इॅम्पॅक्ट ऑफ टिचर एज्युकेशन' या संशोधनात असे दिसून आले की, शिक्षण प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी समुदाय व भविष्यकालीन नागरिकांना एका उंचीवर ठेवणे अपेक्षित आहे व त्यासाठी त्यांना नवीन कौशल्य व ॲटिट्यूड तसेच शिक्षणक्षेत्रात स्पर्धात्मक ज्ञानाची आवश्यकता आहे आणि हे सर्व नवोपक्रमांनी साध्य करता येते.

आरा. एन. (२०१३) यांच्या 'अ कम्पॅरिटिव स्टडी ऑफ बी. एड. टिचींग प्रॅक्टीसेस बिटविन पब्लिक ॲन प्रायव्हेट सेक्टर एज्युकेशनल इन्स्टीट्युशनस इन कराची' या तुलनात्मक अभ्यासातून असे दिसून आले की, शिक्षक प्रशिक्षकाचे अध्यापन शास्त्रीय आशय ज्ञान व अध्यापन पद्धतीची प्रक्रिया या सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही प्रणालीमध्ये वेगवगेळे असते व त्यांचा अवबोधित शिक्षकांच्या अध्यापन प्रॅक्टीसवर खोल परिणाम होतो.

**संशोधनाची पद्धत**

सदर संशोधनात वर्णनात्मक पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**नमुना निवड**

सदर संशोधनात संशोधकांनी सांगली जिल्ह्यातील 9 शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा अभ्यास केला आहे..एकूण 33 षिक्षकांचा समावेश नमुन्यात केला आहे.

**संशोधनाचे साधन**

सदर संशोधनात संशोधनासाठी संशोधक निर्मित प्रश्नावली हे साधन वापरले आहे. ही प्रश्नावली तज्ञांकडून तपासून घेण्यात आली आहे.

**माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वचन**

सदर संशोधनात संशोधनासाठी दोन प्रकारे माहितीचे विश्लेषण केले आहे.

**१ माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण.**

**२ माहितीचे गुणात्मक विश्लेषण.**

**१ माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण.**

शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापनसंबधित नवोपक्रम पध्दती

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

| नवोपक्रम | टक्केवारी |
|---|---|
| 1 फेस टू फेस पद्धत | **96.96** |
| 2 इंडीव्हीजुअल ॲन्ड ग्रुप शेअरींग | **66.66** |
| 3 थिंक पेअर ॲन्ड शेअर | **51.51** |
| 4 ग्रुप प्रोसेसिंग | **63.63** |
| 5 थ्री मिनिट रिव्ह्यु | **33.33** |
| 6 नम्बरड हेड टूगेदर | **3.03** |
| 7 पार्टनर | **30.30** |
| 8 इन बास्केट टेक्निक | **9.09** |
| 9 प्रोजेक्ट मेथड | **81.81** |
| 10 ब्लेंडेड लर्निंग | **15.15** |
| 11 ब्रेन स्टॉर्मिंग | **63.63** |

अर्थनिर्वचन

- फेस टू फेस ही पद्धत तुलनेने जास्तीत जास्त प्रमाणात वापरली जाते.
- थ्री मिनिट रिव्ह्यु, नम्बरड हेड टूगेदर, पार्टनर, इन बास्केट टेक्निक, ब्लेडेड लर्निंग या पद्धतींचा वापर अत्यंत कमी प्रमाणात केला जातो.




## निष्कर्ष

सदर संशोधनात संशोधनासाठी माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व माहितीचे गुणात्मक विश्लेषण यांच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

- फेस टू फेस ही पद्धत जास्तीत जास्त प्रमाणात वापरली जाते. सर्व विषयातील सर्वच घटकासाठी ही पद्धत वापरली जाते.
- इंडीव्हीजुअल ॲन्ड ग्रुप शेअरींग, ग्रुप प्रोसेसिंग, प्रोजेक्ट मेथड, ब्रेन स्टॉर्मिंग या पद्धतींचा वापर ही केला जातो. पण प्रतिसादकांनी 'होय' असा प्रतिसाद दिला असला तरी बऱ्याच प्रतिसादकांनी विषय व घटकाची माहिती दिली नाही.
- थिंक पेअर ॲन्ड शेअर ही पद्धती फेस टू फेस व इंडीव्हीजुअल ॲन्ड ग्रुप शेअरींग, ग्रुप प्रोसेसिंग, प्रोजेक्ट मेथड, ब्रेन स्टॉर्मिंग या पद्धतींच्या तुलनेत कमी वापरली जाते.
- थ्री मिनिट रिव्ह्यु, नम्बरड हेड टूगेदर, पार्टनर, इन बास्केट टेक्निक, ब्लेंडेड लर्निंग या पद्धतींचा वापर अत्यंत कमी प्रमाणात केला जातो.
- या व्यतिरिक्त जिगसॉ पद्धती, अग्रत संघटक, पथक चर्चा, स्वयंशोधन पद्धत, चर्चा पद्धती, रोल प्ले पद्धती, सेमिनार, परिसंवाद पद्धती, प्रश्नोत्तर पद्धती या पद्धतींचा वापर केला जातो.

**चर्चा**

सदर संशोधनात असे लक्षात आले की, थ्री मिनिट रिव्ह्यू, नम्बरड हेड टूगेदर, पार्टनर, इन बास्केट टेक्निक, ब्लेंडेड लर्निंग या पद्धतींचा वापर अत्यंत कमी प्रमाणात केला जातो.

**थ्री मिनिट रिव्ह्यू :** म्हणजेच पूर्ण पाठाचे शेवटच्या तीन मिनिटात विद्यार्थ्यांना जे आकलन झाले आहे. त्याचा सारांश सांगण्यास सांगणे.

**नम्बरड हेड टूगेदर :** या पद्धतीमध्ये चार–चार विद्यार्थ्यांचा गट करून प्रत्येक विद्यार्थ्याला नंबर दिला जातो व शिक्षक कोणताही नंबर पुकारून त्याने काय अध्ययन केले हे सादर करण्यास सांगतात.

**पार्टनर**

दोन विद्यार्थ्यांना वेगवेगळे घटक शिकविले जातात व ते नंतर एकमेकांना समजून सांगण्यास सांगितले जाते. यामुळे विद्यार्थ्यांचे आकलन अधिक पक्के होते.

**इन बास्केट** टेक्निक :वेगवेगळ्या विषयाच्या, घटकाच्या चिठ्ठ्या करून बास्केट, बॉक्स मध्ये टाकल्या जातात व नंतर एक–एक विद्यार्थ्याला पुढे बोलवून एक चिठ्ठी बॉक्स मधून काढून त्याविषयी माहिती सांगण्यास सांगितली जाते.

**ब्लेंडेड लर्निंग**

या पद्धतीमध्ये थोडी माहिती ही शिक्षक–विद्यार्थी समोरासमोर देतात. तर थोडी माहिती ही विद्यार्थ्यांना स्वतः काढून आणण्यास सांगितली जाते.

**संदर्भ सूची**


- आरा. एन. (२०१३). 'अ कम्पॅरिटिव स्टडी ऑफ बी. एड. टिचींग प्रॅक्टीसेस बिटविन पब्लिक ॲन प्रायव्हेट सेक्टर एज्युकेशनल इन्स्टीट्युशन इन कराची' retrieved from http://journal-archives 31.web.com/811-817.pdf
- एन. कल्पनाकुमारी(२०१२). 'मॉडेल ॲन्ड इनॉव्हेटिव्ह प्रॅक्टीसेस ॲन्ड इॅम्पॅक्ट ऑफ टिचर एज्युकेशन' retrieved from www.ijmer-in/pdfvolume1-issue2-2012/430-435.pdf
- रमणाराव बी. व्ही. (२०१३) . 'ॲन ॲनॉलिटिकल स्टडी ऑफ इनोव्हेटिव्ह बिहेव्हिअर ॲन्ड ऑक्युपेशनल स्ट्रेस इन प्रायमरी ग्रेड टीचर ऑफ बिलासपूर डिव्हीजन' retrieved from http://shodhganga.inflibnet.ac.in/